# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर  **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार  **Year (वर्ष):** 2019
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0468  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 02:09 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 07/06/2019
      **Time Period (कालावधी):** पहर 7  **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/06/2019
      **Time From (वेळेपासून):** 18:30 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 19:00 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 08/06/2019  **Time (वेळ):** 01:55 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद** 009  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/06/2019 02:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** जिल्हा कोषागार कार्यालय,सोलापूर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** आनंद महादेव वाघमोडे
   (b) **Father's Name (वडील का नाव) :** महादेव
   (c) **Date/Year of Birth (जन्म** 1991  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
   **Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामी, नर्जिक पिंपरी, ता मोहोळ,सोलापूर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामी, नर्जिक पिंपरी, ता मोहोळ,सोलापूर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8329427375

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष शिवाजी सावळे | | वडील का नाम : शिवाजी | 1. पद लेखा लिपीक, जिल्हा कोषागार कार्यालय,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | लक्ष्मण नागू भांगरे | | वडील का नाम : नागू भांगरे | 1. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादी जबाब दि. 08.06.2019 मी आनंद महादेव वाघमोडे, वय 28 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. 137 नेमूणक पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण, रा. नजिक पिंपरी, ता. मोहोळ, जि.सोलापूर मोबाईल क्रमांक 8329427375 समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई वडील, पत्नी व दोन मुलासंह राहण्यास असून मी सोलापूर ग्रामीण पोलीस दलामध्ये सन 2012 पासून पोलीस कॉन्स्टेबल पदावर नोकरीस असून त्यावर आमचे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 20.11.2018 ते दि.27.04.2019 या कालावधीत निलंबीत होतो. सदर कालावधीमध्ये मला शासनाकडून निर्वाह भत्ता मिळणार होता. परंतू तो त्यावेळीच न मिळाल्याने तो लवकरात लवकर मिळण्यासाठी मी दि.01.05.2019 रोजी मा.पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांना अर्ज सादर केला होता. त्यानंतर सदरचे बील तयार करून ते मंजूरीसाठी जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर यांचेकडे पाठवले होते. दरम्यानच्या कालावधीत मी बीलबाबत पोलीस अधिक्षक कार्यालयातील लिपीकांकडे विचारपूस करता सदरचे बील हे सहा.फौजदार श्री.लक्ष्मण भांगरे यांच्या मार्फतीने कोषागार कार्यालयात गेले असल्याची माहिती समजली. त्यावरून मी दि.04.06.2019 रोजी सहायक फौजदार भांगरे यांची भेट घेतली असता त्यांनी ते बील मंजूरीसाठी कोषागार कार्यालयात गेले असून ते सद्या तेथील लेखा लिपीक श्री. सावळे यांचेकडे प्रलंबीत असून त्यांना 500/- रुपये दिल्याशिवाय ते बील मंजूर करणार नसल्याचे सांगितले. त्याचेप्रमाणे मी श्री.सावळे यांची देखील भेट घेतली असता त्यांनीही त्यांना 500/- रूपये द्यावे लागेल असे म्हणाले. त्यांना मला लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी शरद कोळी यांच्यासोबत न्टी करप्शन ब्युरो, सोलापूर या कार्यालयात आलो. तेथे श्री.जगदीश भोपळे, पोलीस निरीक्षक, न्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्या समक्ष तक्रार नोंदवली. त्यावेळी त्यांना हे सांगितले की, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या कार्यालयात कामाव्यतिरीक्त कोणालाही आतमध्ये सोडत नाहीत. त्यानंतर श्री. भोपळे यांनी सदर तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परीषद सोलापूर कार्यालयातील श्री. गिते व श्री. घुले यांना पंच म्हणून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर उपलब्ध करून घेतलेल्या पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी श्री.भोपळे यांच्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. तसेच सापळा अधिकारी श्री.भोपळे यांनी मी दिलेली तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व श्री. भोपळे यांनी सह्या केल्या. त्यानंतर श्री. भोपळे, पोलीस निरीक्षक,



Scanned by CamScanner

न्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी मी पोलीस अधिक्षक,सोलापूर ग्रामीण कार्यालयात जावून तेथे श्री. भांगरे यांची व जिल्हा कोषागार कार्यालयातील श्री. साळवे यांची भेट घेवून त्यांच्याशी माझ्या बिलाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, तसेच आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पडताळणीबाबतच्या सविस्तर सुचना देवून मला पोलीस अधिक्षक कार्यालयाकडे माझ्या गळ्यात व्हईस रेकडर शर्टाचे आतील बाजूस आडकावून शरद कोळी यांच्या गाडीतून पाठवले. त्यावरून मी प्रथम पोलीस अधिक्षक कार्यालयात जावून तेथे श्री. भांगरे, सहायक फौजदार यांची भेट घेतली. त्यावेळी श्री.भांगरे हे मला जिल्हा कोषागार कार्यालय सोलापूर येथे घेवून गेले. तेथे लिपीक श्री. सावळे यांचेबाबत विचारणा केली असता ते कार्यालयाच्या बाहेर गेले असल्याचे समजले. त्यावरून मी व श्री. भांगरे परत पोलीस अधिक्षक कार्यालया समोर आलो. तेथे मी भांगरे यांचेकडे विचारणा करता त्यांनी श्री. सावळे यांना 500/- रूपये दिल्याशिवाय काम होणार नाही असे सांगितले. त्यानंतर मी परत न्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात आलो. तेथे श्री.भोपळे, पोलीस निरीक्षक न्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये मी उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर श्री.भोपळे, पोलीस निरीक्षक न्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांनी व्हईस रेकडरमध्ये माझ्यात व श्री.भांगरे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये श्री.भांगरे यांनी 500/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. परंतू सदरची लाचेची रक्कम ही कोषागार कार्यालयात द्यावयाची असल्याने तेथे श्री. सावळे यांची भेट न झाल्याने पुन्हा एकदा पडताळणीसाठी कोषागार अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे पाठवण्याचे सर्वानुमते ठरवले. त्यासाठी मला पुन्हा सविस्तर सुचना देवून पुन्हा व्हईस रेकर्डर गळ्यात शर्टाचे आतील बाजूस आडकावून पुन्हा जिल्हा कोषागार कार्यालयात पाठवले. त्यावेळी मी श्री. सावळे यांची भेट घेवून किती रक्कम द्यायची याबाबत चर्चा करता त्यांनी 500/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मी पुन्हा न्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात परत आलो. तेथे माझ्यात व श्री सावळे यांच्यात झालेले संभाषण पंचांनी व श्री. भोपळे साहेबांनी ऐकले.पुरवणी :- फिर्यादी आनंद महादेव वाघमोडे यांचे दि.08.06.2019 रोजीचे फिर्यादी जबाबालगतचे असे.

----------------------------------------------------------------------------------------------------------त्यानंतर श्री. भोपळे, पोलीस निरीक्षक न्टी करप्शन ब्युरो,सोलापूर यांच्या सुचनेवरून मी श्री.सावळे व श्री. भांगरे यांना देण्यासाठी 500/- रूपयाची एक नोट हजर केली. सदर नोटेचा क्रमांक एका कागदवर लिहून त्यावर श्री.भोपळे व दोन्ही पंचांनी सह्या केल्या. सदर नोटेस थ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांची सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही केली. त्यानंतर यातील श्री.सावळे व श्री. भांगरे यांच्यावर जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर व पोलीस अधिक्षक कार्यालय, सोलापूर येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी शरद कोळी यांचे गाडीतून व उर्वरीत सापळा पथक, पंच शासकीय जीप क्रमांक एम.एच.13 बी.क्यू.0019 मधून जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर येथे गेलो. तेथे मी कार्यालयाच्या बाहेर उभा राहून श्री.सावळे यांना मोबाईलवरून संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी मला सोमवारी येण्यास सांगितले. त्यावरून मी पुन्हा पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या कार्यालयाकडे गेलो. वाटेत जात असताना श्री. भांगरे यांना मोबाईलवरून संपर्क केला असता त्यांनी कार्यालयात येण्यास सांगितले. त्यावरून मी पहिल्या मजल्यावरील लेखा शाखेत जावून श्री. भांगरे यांची भेट घेतली असता त्यांनी मला सदर लाचेची रक्कम ही श्री.सावळे यांच्याकडेच देण्यास सांगितले असल्याने मी पुन्हा चालत जिल्हा कोषागार कार्यालयाकडे गेलो असता तेथे समोर श्री. सावळे हे दिसले. त्यांनी मला जवळ बोलावून घेवून डाव्या हाताची बोटे ऐकमेकांवर घासून लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझ्या पन्टच्या खिश्यामध्ये ठेवलेल्या लाचेची नोट उजव्या हाताने काढून श्री.सावळे यांच्या समोर धरली असता त्यांनी ती लाचेची रककम डाव्या हाताने स्विकारून ती नोट त्यांचे अंगावरील पन्टच्या डाव्या खिश्यामध्ये ठेवली असता मी कार्यालयाच्या बाहेर येवून केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येवून श्री.सावळे यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर सापळा अधिकारी श्री. भोपळे यांनी दोन्ही पंचासमक्ष श्री. सावळे यांचे दोन्ही हाताची, पन्टची अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे डावे हाताच्या बोटाच्या पेऱ्यावर व पटचे डाव्या खिश्यात नोट ठेवलेल्या ठिकाणी अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच खिश्यामध्ये मिळून आलेल्या नोटेची कागदावर नमूद केलेल्या नोटेच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. तसेच सदर नोटेची देखील .वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटेवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली आहे. सदरची नोट व पन्ट पुराव्याकामी जप्त करण्यात आलेली आहे. सदरबाबत सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा न्टी करप्शन ब्युरो,सोलापूरच्या कार्यालयात दि.07.06.2019 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक संतोष शिवाजी सावळे, वय 43 वर्षे, पद लेखा लिपीक, जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर व लक्ष्मण नागू भांगरे, वय 52 वर्षे, सहायक फौजदार, नेमणूक पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझे निलंबन कालावधीतील निर्वाह भत्याचे बील मंजूर करण्यासाठी 500/- रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.07.06.2019 रोजी 18.30 वा.च्या सुमारास जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूरच्या कार्यालयात संतोष शिवाजी सावळे यांनी स्विकारुन सांपत्तीक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी संतोष शिवाजी सावळे, वय 43 वर्षे, पद लेखा लिपीक, जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर व लक्ष्मण नागू भांगरे, वय 52 वर्षे, सहायक फौजदार, नेमणूक पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7,12 प्रमाणे फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष (जगदीश भोपळे) पोलीस निरीक्षक न्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rajendra Haribhau Bahirat(I (Inspector)) / PCMH87938 **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार



Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अमंलदार
सदर बझार पोलिस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Rajendra Haribhau Bahirat
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH87938



Scanned by CamScanner